चल मोजूया

यशच्या पलंगासाठी चादर हवी : एक फार आखूड, एक फार लांब आहे.

पलंगाची लांबी मोजा.
मग चादरीचे माप ठरवा.

यशकडे पलंगाचे माप मोजण्यासाठी टेप नाही. पलंगाचे माप वितीने मोजूया.

यशने पलंगाची लांबी **११** विती इतकी मोजली. त्यामुळे चादर **१३** विती आणावी लागेल. कारण चादर थोडी मोठी लागते.

चर्चा करा : कोणत्या वस्तूंची लांबी मोजली जाते ?
लांबी मोजण्यासाठी कोणते साधन वापरावे ?

१) तुझ्या परिसरातील दोन कुंड्यांमधील अंतर पावलांनी मोज. ☐ पावले.

२) वर्तमानपत्राची लांबी किती वीत असेल याचा अंदाज बांध. आता मोजून वर्तमानपत्राची लांबी किती वीत आहे ते लिही.
☐ वीत.